# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### औद्योगिक क्षेत्रांतील विकसित भूखंड परत मिळणेबाबत

**(१) ७१६१ (१०-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रसायनी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रांतील संपादित केलेली, परंतु न वापरलेली जमिन परत मिळावी व वापरलेल्या जमिनीच्या एकूण क्षेत्रांपैकी १५ टक्के विकसित भूखंड मिळणेबाबतचे निवेदन रसायनी पाताळगंगा प्रकल्पग्रस्त विकास संघटना रसायनी (ता.पनवेल, जि.रायगड) यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१५ च्या सुमारास मा.उद्योग मंत्री यांना दिले, हे खरे आहे काय,

(२) तसेच कराडे बुद्रुक (ता.पनवेल, जि.रायगड) येथे अतिरिक्त पाताळगंगा औद्योगिक क्षेत्राकरिता संपादित करण्यात आलेल्या शेतक-यांच्या जमिनीच्या मोबदल्यात महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींची पुनर्वसन अधिनियम १९७६ नुसार पुनर्वसनाच्या सुविधा लवकरात लवकर प्रकल्पग्रस्तांना मिळाव्यात अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडे केली आहे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनाच्या सुविधा मिळण्याबाबत तसेच उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-०६-२०१५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) रसायनी पाताळगंगा प्रकल्पग्रस्त विकास संघटना यांनी दिलेलया निवेदनातील मागण्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून तपासण्यात आले असून, त्यांच्याशी संबंधित असलेल्या मागणीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. उर्वरित मागण्यांचा महामंडळाशी संबंधित नाही असे संबंधितांना कळविण्यात आले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील औद्योगिक कारणास्तव करण्यात येणारे भूसंपदंन हे महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील प्रकरण ६ नुसार करण्यात येत असल्यामुळे महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६/१९९९ च्या तरतूदी सदर संपादनास लागू होत नाही, असे स्थानिक लोकप्रतिनिधींना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पेंधर ग्रामपंचायत (ता.पनवेल, जि.रायगड) हद्दीमध्ये येणा-या ११ औद्योगिक कंपन्याकडे सुमारे ३२ लाखाच्या थकबाकीबाबत**

**(२) ७१७७ (०७-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेंधर ग्रामपंचायत (ता.पनवेल, जि.रायगड) हद्दीमध्ये येणा-या ११ औद्योगिक कंपन्याकडे सुमारे ३२ लाखांची थकबाकी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर थकबाकी वसूलीकरिता ग्रामपंचायतीने माहे डिसेंबर, २०१४ मध्ये पोलिस संरक्षणाची मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या ग्रामपंचायतीची थकबाकी या औद्योगिक कंपन्यांकडून वसूल करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१५) :** (१) होय, अंशत: खरे आहे. औद्योगिक कंपन्यांकडे असणा-या सुमारे रु.३२ लाख एवढ्या थकबाकीपैकी रक्कम रु.१९,४५,६६०/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली असून, सुमारे ६ कंपन्यांकडील रक्कम रु.१२,७०,३८८/- एवढी रक्कम वसूल करण्याची कार्यवाही संबंधित ग्रामपंचायतीमार्फत सुरु आहे.
(२) होय.
(३) औद्योगिक कंपन्यांकडे असणारी थकबाकी वसूल करणेसंदर्भात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ चे कलम १२९ (१) अन्वये कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंतोरे (ता. पेण, जि.रायगड) येथील वाळू उत्खनन**

**(३) ७१९७ (०८-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंतोरे (ता. पेण, जि.रायगड) येथे वाळू उत्खनन विरोधात तहसिल कार्यालय व पेण पोलिस ठाणे यांनी दोन डंपर , २७४ ब्रास वाळू, दोन पोकलन असा एकूण ६३ लाख १० हजार

२८९ रुपयांचा मुद्देमाल दिनांक २० डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

अंतोरे (ता.पेण, जि.रायगड) येथे वाळू उत्खनन विरोधात तहसिल कार्यालय व पेण पोलिस ठाणे यांनी तीन डंपर, २७१ ब्रास वाळू, दोन पोकलन असा एकूण ७२ लाख ९० हजार ४७१ रुपयांचा मुद्देमाल दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी जप्त केला आहे.

(२) यासंदर्भात पेण पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१०/२०१५, भा.दं.वि. कलम ३७९, ४३१, ३४ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ६(१)(क)/१५(१) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४८ (७) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरण पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बांदलपाडा-खेडले-पऱ्हे-ओजिवले (ता.मुरबाड, जि. ठाणे) या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(४) ७२३९ (०९.०४.२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांदलपाडा-खेडले-पऱ्हे-ओजिवले (ता.मुरबाड, जि. ठाणे) या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने मंजुरी दिलेली असताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या व ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे माहे जानेवारी २०१५ पर्यंत काम झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याची कामे पूर्ण न करणा-या संबंधिताविरुध्द व ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच रस्त्याची कामे वेळेत पूर्ण न करणाऱ्या संबंधित ठेकेदाराकडून ठेका काढुन घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४.७.२०१५) :** (१) होय.

(२) ठेकेदारास मार्च, २०१५ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली असून त्या कालावधीमध्ये मंजूर १.०० कि.मी. लांबीचे रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक विकास महामंडळाने**
**रस्त्याचे चौपदरीकरण न केल्याबाबत**

**(५) ७२४५ (०९-०४-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मुरबाड व अंबरनाथ तालुक्यांना जोडणा-या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारित येणा-या अंबरनाथ बारवी डॅम मार्गे मुरबाड जाणा-या रस्त्याची दुरावस्था झालेली असून स्थानिक रहिवाशी व लोकप्रतिनिधींनी चौपदरी रस्त्याची मागणी करुन सुध्दा औद्योगिक विकास महामंडळाने सदरच्या रस्त्याचे चौपदरीकरण न केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबबत औद्योगिक विकास महामंडळाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, दिरंगाईची कारणे काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (१५-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) गार्लिक फाटा ते बारवी डेंम या ५.५० मी. रुंदीच्या व १५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे मजबुतीकरण व पुर्नडांबरीकरणाचे काम तसेच बारवी डॅम ते मुरबाड फाटा या १२.५० कि.मी. लांबीच्या व ३.७५ मी. रुंदीच्या डांबरी रस्त्याचे ५.७५ मी. पर्यंत रुंदीकरण, मजबुतीकरण व पुर्नडांबरीकरणाच्या कामासाठी महामंडळाकडून निविदा काढण्यात आल्या असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी रुग्णालयात डायलिसीस करण्याबाबत**

**(६) ७२५६ (०७-०४-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी रुग्णालयात डायलिसीस करण्यासाठी तब्बल १७ हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१४ वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले व तदनुसार डायलिसीससाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात पैशाची मागणी करणाऱ्या खाजगी संस्था व वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५) :** (१) होय.

छत्रपती शिवजी महाराज रुग्णालयात तक्रार मिळाली त्यासुमारास निव्वळ डायलिसिस व त्याच्या पुनर्वापरालायक नळ्या इ. सह एकूण डायलिसिसाठी रुपये ७,६५०/- खर्च येत होता. डायलिसिसाठी आवश्यक फिश्चुला करण्यासाठी त्याच्या साहित्यासह रुपये ८५००/- घेतले जात होते.

तक्रारीनंतर फिश्चुला रुग्णालयातून रुग्णालयाच्या दराने करुन देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे मात्र करारातील अटींस अधीन राहून ८ वेळेच्या निव्वळ डायलिसीसच्या खर्च आता रुपये ११,१९०/- होतो.

(२) याबाबत स्थानिक स्तरावर चौकशी करण्यात आली असून फिश्चुला करण्यासाठी रुग्णालयातच व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर शस्त्रक्रिया रुग्णालयात झाल्यावर रुग्णालयाच्या प्रचलित शूल्क दरानुसार शुल्क आकारले जाते.

(३) चौकशीअंती असे निदर्शनास आले की, रुग्णांना फिश्चुला करण्याचा वाढीव खर्च होतो. त्यासाठी आता रुग्णालयात व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली आहे. इतर शुल्क हे संबंधित यंत्रणेशी (मुक्ता डायलिसीस केंद्र) झालेल्या करारनाम्यानुसार आहे. त्यामुळे सदर खाजगी संस्थेवर कारवाई करण्यात आलेली नाही.

अनेक वर्षापूर्वी झालेल्या करारनाम्यात आता कालानुरुप व सुयोग्य बदल करण्यासाठी आयुक्तांनी प्रत्यक्ष चर्चा केली असून, संचालक, मुक्ता डायलिसीस यांना आपली बालू मांडण्यास सांगण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुरबाड (जि.ठाणे) पंचायत समिती येथील काही कर्मचारी व अधिकारी अनेक वर्षापासून एकाच जागी कार्यरत असल्याबाबत

**(७) ७३०४ (०८-०४-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील मुरबाड पंचायत समिती येथील काही कर्मचारी व अधिकारी बऱ्याच वर्षापासून कार्यरत असून त्यांच्या बदल्या वर्षानुवर्षे न झाल्याने आर्थिक गैरव्यवहारातून हे अधिकारी व कर्मचारी एकाच जागी असल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यान कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पंचायत समिती मुरबाड येथे तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असेल अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, दिरंगाईची कारणे कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१५) :** (१) पंचायत समिती, मुरबाड अंतर्गत कार्यरत असलेले गट अ व गट ब मधील अधिकारी यांना सध्याच्या पदावर तीन वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेला नाही.

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात ३ वर्षापेक्षा कमी सेवा झालेले २२ कर्मचारी, ३ वर्षे ते १० वर्षे या कालावधीत सेवा झालेले २४ कर्मचारी तर १० वर्षापेक्षा जास्त सेवा झालेले ६ कर्मचारी आहेत. १० वर्षापेक्षा जास्त सेवा झालेले कर्मचारी हे प्रामुख्याने शासन निर्णय दिनांक १५ मे, २०१४ मधील प्रकरण १ मधील अ.क्र. ३ मधील ३ (ब) (ख), प्रकरण १ मधील अ.क्र. २ मधील (४) तरतूदीनुसार सूट देण्यात आलेले कर्मचारी आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) व (४) जिल्हा परिषदेच्या गट क व गट ड कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्याबाबत शासन निर्णय क्र. जिपब ४१४/प्र.क्र.११२/आ.१४, दिनांक १५ मे, २०१४ अन्वये विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार जिल्हास्तरीय बदल्यासाठी १० वर्षे व तालुकास्तरीय ५ वर्षे वास्तव्य सेवा कालावधी आवश्यक आहे. व जिल्हास्तरीय बदल्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी व तालुकास्तरीय बदल्यासाठी गट विकास अधिकारी हे सक्षम प्राधिकारी आहेत.

---

**ठाणे जिल्हयातील मुरबाड तालुक्यात रोजगारासाठी आदिवासींनी तहसिलदार कार्यालयावर मोर्चा काढल्याबाबत**

**(८) ७३१२ (१०-०४-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील मुरबाड तालुक्यात रोजगारासाठी आदिवासींनी तहसिलदार कार्यालयावर मोर्चा काढल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर स्थानिक आदिवासींना रोजगार हमी योजनेतंर्गत रोजगार उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१६-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात रोजगारासाठी आदिवासींनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये तहसिल कार्यालयावर मोर्चा काढल्याचे निदर्शनास आले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदप (ता.कल्याण, जि.ठाणे) गावाच्या पाणीपुरवठा योजनेच्या साठवण टाकीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत**

**(९) ७३२० (०७-०४-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदप (ता.कल्याण, जि.ठाणे ) गावाच्या २७ लाख रुपये खर्च करुन उभारण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या साठवण टाकीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने व जल वाहिनीचे पाईप उखडून पडल्याने नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणा-या ठेकेदारावर व ठेकेदाराशी संगनमत करणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१८-०६-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

साठवण टाकीचे बांधकाम करण्यात आले नाही.टाकीचे लाईन आऊट दिलेनंतर सदर जागा वन विभागाची असल्याचे निदर्शनास आल्याने कोणतेही काम करण्यात आले नाही. ग्रामपंचायतीने टाकी रद्द करण्यात आल्याचा ठराव केलेला आहे. त्यामुळे साठवण टाकीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे प्रश्न उद्भवत नाही.

मुख्य जलवाहिनीचे वितरण वाहिनीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच दोन वर्षापासून सदरचे योजनेतून पाणी पुरवठ सुरु केलेला असून ग्रामपंचायत मार्फतच योजना चालवण्यात येत आहे. संपूर्ण गावात कॉक्रीटचे रस्ते व सुरुवातीलाच कठीण खडक असल्याने वितरण वाहीनीसाठीचे खोदकाम करणे शक्य झालेले नाही. अशा ठिकाणच्या पाईपचे नुकसान झालेले आहे. करीता सदरच्या योजनेच्या कामातील केवळ मुख्य जलवाहीनीचे देयक अदा करण्यात आलेले असून वितरण वाहीनीचे देयक अदा केलेले नाही. यास्तव कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अन्न व औषध प्रशासनात (एफडीए) झालेल्या औषध निरीक्षकांच्या नियुक्त्यांपैकी ३० निरिक्षकांची अनुभव प्रमाणपत्रे संशयास्पद असल्याबाबत**

**(१०) ७३८५ (०६-०४-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २००७ मध्ये अन्न व औषध प्रशासनात (एफडीए) झालेल्या औषध निरीक्षकांच्या नियुक्त्यांपैकी ३० निरिक्षकांची अनुभव प्रमाणपत्रे संशयास्पद असल्याचे आढळून आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निरीक्षकांच्या नियुक्त्यासंदर्भातील चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, दोषी आढळून आलेल्या निरिक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१६-०६-२०१५) :** (१) तक्रारीप्रमाणे कार्यवाही होत आहे.
(२) औषध निरिक्षकांच्या नियुक्तीसंदर्भातील चौकशी सुरु आहे.
(३) चौकशी पूर्ण झाल्यावर योग्य ती कार्यवाही होईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) उद्देशा बाबत**

**(११) ७४२५ (०७-०४-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावने, अकुशल रोजगाराची पूर्तता आणि कायमस्वरूपी मालमत्तेची उभारणी हा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) उद्देश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात आतापर्यंत या योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या मालमत्तापैकी १२ टक्के मालमत्तांचे अस्तित्वच आढळून आलेले नसल्याचे इंदिरा गांधी विकास संशोधन संस्थेच्या पाहणीत नुकतेच आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली आहे,
(४) यासंदर्भात अद्याप चौकशी केली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

मनरेगा अंतर्गत निर्मित सर्व संसाधनांची ८८% पडताळणी होऊन त्या अस्तित्वात तसेच वापरात असल्याचे स्पष्ट झाले. उर्वरित १२% मालमत्तेच्या सर्वेक्षणासाठी गणक कामाच्या ठिकाणांपर्यंत पोहचू शकले नाही. असे इंदिरा गांधी विकास संशोधन संस्थेच्या अहवालात नमूद केले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील उद्योग क्षेत्रात उद्योग धंदे आणि गुंतवणूक वाढवण्यासाठी घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(१२) ७४५२ (०९-०४-२०११). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उद्योग क्षेत्रात उद्योग धंदे यावेत आणि गुंतवणूक वाढावी यासाठी राज्य शासनाने डिसेंबर २०१४ वा त्यासुमारास निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सरकाराकडून नाममात्र दरात भूखंड घेवून त्यावर ठराविक कालावधीत उद्योग सुरु न करणा-या उद्योजक व कारखानदारांकडील जमीन ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१०-०६-२०१५) :** (१) राज्यातील उद्योग व व्यवसाय स्थापन करण्यासाठी विविध मान्यता व नाहरकती तातडीने वसुलीभरित्या उपलब्ध व्हाव्यात या हेतूने "मेक इन महाराष्ट्र" हा उपक्रम हाती घेण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षेतेखाली दिनांक १७/११/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला.
(२) म.औ.वि.महामंडळाचे औद्योगिक क्षेत्रात उद्योग उभारणीसाठी लागणाऱ्या परवानग्यांची संख्या १४ वरुन ५ करण्यासंदर्भात कालबध्द कार्यक्रम आखुन परवानग्या एकत्रित करणे व काही अनावश्यक परवानग्या रद्द करणे ही कार्यवाही सुरु केलेली आहे. अति विशाल प्रकल्प व परकिय गुंतवणूक आणणारे उद्योगांना भूखंड वाटपामध्ये प्राधान्य देऊन औद्योगिक क्षेत्र व भूखंड निवडीपासून ते भूखंडाचा ताबा देईपर्यंत महामंडाळाच्या भू विभागामार्फत व पणन विभागामार्फत समन्वय साधुन प्रत्येक टप्प्यात मार्गदर्शन व सहाय्य करण्यात येत आहे.
(३) होय,

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड उद्योजकांना नाममात्र दराने वाटप करण्याचे धोरण नाही. महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना वाटप केलेले भूखंड विहित कालावधीमध्ये विकसित न केल्याने करारनाम्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करुन महामंडळाच्या ताब्यात परत घेण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.
(४) ज्या उद्योजकांनी उद्योग सुरु केले नाहीत अशा एकूण १०७५ उद्योजकांचे भूखंड नियमानुसार नोटीस देण्यात येऊन महामंडळाच्या ताब्यात घेण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील गृहनिर्माण योजनेकडे म्हाडाचे होत असलेले दुर्लक्ष**

**(१३) ७४५६ (०७-०४-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या मुंबई मंडळाने मुंबईत गृहयोजनेसाठी भूखंडच नाहीत म्हणून खास मोहिम आखून ७७ भूखंडावर गृहयोजना राबविण्याच्या दृष्टीने कोणत्याही कारवाई केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) सदर भूखंडावर योजना राबविल्यास हजारोंच्या संख्येने हाउसिंग स्टॉक निर्माण होणार असतानाही मंडळाकडून मात्र या भूखंडावरील गृहयोजनेकडे दुर्लक्षच होताना दिसत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) सदरहू भुखंड सापडल्यानंतर मंडळाचे काही महिन्यातच निविदा काढून त्यावर गृहयोजना राबवू असे जाहिरात केलेले असता, अद्यापही गृहयोजना न राबविण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) मुंबईत जागा नसल्याने म्हाडाच्या घरांची संख्या रोडावलेली असताना हजारोच्या संख्येने घरे उभारली जाऊ शकतात अशा या भूखंडवर गृहयोजना न राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (०२-०७-२०१५) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीमध्ये मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे एकूण १०४ अभिन्यास असून म्हाडाच्या काही मोकळ्या भूखंडावर यापूर्वीच म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना राबविण्यात आलेल्या आहेत. शिल्लक मोकळ्या अतिक्रमणरहित भूखंडावर प्राधान्याने गृहनिर्माण योजना प्रस्तावित करण्यात आल्या असून त्या मंजूरीच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आहेत. त्या व्यतिरिक्त जुन्या वसाहतींचा पुनर्विकास, संक्रमण शिबिरांचा पुनर्विकास इ.विविध प्रकारे जास्तीत जास्त गृहनिर्माण करण्याकरीता प्रयत्न सुरु असून योजना प्रगतीपथावर आहेत.

---

**शासकीय भुखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थातील सदनिका हस्तांतरीत करण्यासाठी कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत**

**(१४) ७४६१ (०४-०४-२०१४). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय भुखंडावर स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थातील सदनिका हस्तांतरीत करताना त्यांचे कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादा रुपये २०,०००/- ऐवजी रु.१,००,०००/- वाढविण्यासाठी प्रधान सचिव, महसूल यांना जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना सन २०१२ मध्ये प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कौटुंबिक मासिक उत्पन्न वाढविण्यासाठी अद्याप निर्णय न झाल्यामुळे सभासदांचे सभासदत्व हस्तांतराचे किती प्रस्ताव प्रलंबित असून किती महसूलापासून शासन वंचित आहे,

(३) असल्यास, सभासदांचे सदस्यत्व हस्तांतरणासाठी त्वरीत निर्णय घेण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०६-२०१५) :** (१), (२), (३) व (४)

महसूल विभागाच्या अखत्यारितील प्रदान केलेल्या शासकिय जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांतील सदनिका हस्तांतरीत करताना सभासंदाचे कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादे विषयक अटीबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

---

**राज्यातील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या**
**निवडणूका दिलेल्या मुदतीत पूर्ण करण्याबाबत**

**(१५) ७४८३ (१०-०४-२०१५). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकार क्षेत्रातील निवडणूका राज्याच्या ९७ व्या घटना दुरुस्ती अन्वये राज्यातील सहकारी संस्थाच्या निवडूका अ, ब, क, ड या वर्गिकरणानुसार सहकार निवडणूक आयोगामार्फत घेतल्या जातात हे खरे आहे काय,

(२) राज्यातील अ,ब,क,ड या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूका माहे जून २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, क प्रकारातील संस्थाच्या निवडणूका घेण्यासाठी सहकार खात्यातील कर्मचारी नियुक्त करणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निवडणुकीसाठी असणारे अपुरे कर्मचारी मिळणारे मानधन अत्यंत कमी असल्यामुळे या निवडणूका दिलेल्या मुदतीत पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) तसेच क व ड या वर्गीकरणात मोडणा-या विविध सहकारी संस्था व दूध संस्थाची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असून यावर्गातील संस्थाकडून निवडणूक निधी जमा करण्यास सुट देण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०६-२०१५) :** (१) होय.

(२) दिनांक ३१/०३/२०१३ पर्यंत समितीची मुदत संपलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणुका दिनांक ३०/०६/२०१५ पूर्वी घेण्याची कलम ७३ कब (१३) मध्ये तरतूद आहे.

(३) नाही.

(४) शासनाने निवडणुकीस पात्र सहकारी संस्थाच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाची स्थापना केलेली आहे व निवडणुक नियमातील तरतुदीनुसार प्राधिकरण शासनाचे कोणत्याही विभागाचे अधिकारी, कर्मचारी, सहकारी संस्थांचे अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी यांची नेमणूक करु शकते. त्यासाठी प्राधिकारणाने पारिश्रमिक व भत्ते या बाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. प्राधिकरण निवडणुकीस पात्र सहकारी संस्थाच्या निवडणुका मुदतीत पूर्ण करीत आहे.

(५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ कब (१३) नुसार निवडणुकीस पात्र सहकारी संस्थाने निवडणूक निधी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाकडे जमा करणे अनवार्य असून ज्या संस्था असा निवडणुक निधी जमा करणार नाहीत अशा संस्थाकडून सदर निवडणुक निधी निबंधकाला जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुली प्रमाणपत्र निर्गमित करुन सक्तीने वसुल करता येईल अशी स्पष्ट तरतूद असल्याने निवडणुकीस पात्र कोणत्याही संस्थेस निवडणुक निधी जमा करण्यापासून सूट देता येणार नाही. सूट दिल्यास या संस्थांच्या निवडणूका निधी अभावी घेणे शक्य होणार नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी मुलींचे लैंगिक शोषण होत असल्याबाबत**

**(१६) ७४८४ (१०-०४-२०१५). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी मुलींचे लैंगिक शोषण करुन त्यांना कुमारी माता बनविण्याची संख्या वाढत असल्याने या कुमारी मातांची गोखले इंस्टीट्युट ऑफ पॉलिटीक्स अॅण्ड इकोनॉमिक या संस्थेतर्फे सर्वेक्षण करण्यात येत आह, ह खरे आहे काय,
(२) असल्यास, या मुलींचे लैंगिक शोषण थांबविण्यासाठी व कुमारी मातांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व कोणत्या स्वरुपाच्या आहेत,
(३) तसेच अशा प्रकारे आदिवासी मुलींचे लैंगिक शोषण करणा-या ठेकेदारांवर शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. विष्णु सवरा (१६-०७-२०१५) :** (१) गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स अॅण्ड इकॉनॉमिक्स या संस्थेतर्फे विदर्भातील कुमारी मातांच्या सर्वेक्षण करण्याबाबतचा प्रस्ताव आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेमार्फत शासनास सादर करण्यात आला असून त्याऐवजी विदर्भातील कुमारी मातांच्या पुनर्वसनासाठी स्थानिक स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने कुमारी मातांची माहिती घेऊन सर्वकष योजना प्रस्तावित करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(२) जिल्ह्यातील कुमारी माता व त्यांचे मुलांच्या पुनर्वसनाकरिता मारेगांव तालुक्यातील टाकरखेडा गट क्र.३४ व ३५ येथील ५ एकर ई क्लास जमीनीवर स्वाधार केंद्र उभारणे प्रस्तावित आहे.

तसेच, केंद्रवर्ती अर्थसंकल्प योनजेतून रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने लाभ देण्यात आला आहे.
(३) यवतमाळ जिल्ह्यात पोलीस विभागाकडे प्राप्त तक्रारी प्रमाणे गुन्हे नोंदवून वेळीच आवश्यक कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायमस्वरुपी समाविष्ट करण्याबाबत**

**(१७) ७४९९ (०७-०४-२०१५). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९६ पासून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये दैनंदिन कामासाठी कंत्राटी पध्दतीवर लिपिक-टंकलेखक, लघु टंकलेखक, शिपाई, वाहनचालक इत्यादी पदांवर गेली सुमारे १७ ते १८ वर्षे कार्यरत असलेल्या कामगारांनी आपल्याला कायमस्वरुपी शासन सेवेत सामावून घेण्यासाठी माहे डिसेंबर, २०१४ वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाप्रकारे या सर्व कर्मचा-यांना नियमित वेतन वाढ, वैद्यकीय सेवा इत्यादी मिळण्यासाठी व त्यांना शासकीय सेवेत कायमस्वरुपी समाविष्ट करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१०-०७-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र क्षेत्र (सु.नि.व.पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(आय) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दुय्यम असणारा कर्मचारीवृंद नियुक्त करण्याचे अधिकार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास आहेत आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे स्वायत्त संस्था असल्याने त्यामधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न येत नाही. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील कंत्राटी व सल्लागार पध्दतीने केलेल्या नियुक्त्या या तात्पुरत्या स्वरुपातील असतील असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने ९ व्या बैठकीमध्ये ठराव क्र ९.६.५ पारित केलेला आहे व त्यामुळे कंत्राटातील अटी व शर्तीप्रमाणे त्यांची सुविधेबाबत अनुज्ञेयता निश्चित केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वांद्रे (पू) मुंबई येथील स्कायवॉकचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत**

**(१८) ७५०२ (०७-०४-२०१५). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पू) मुंबई येथील रेल्वे स्टेशनला असलेला स्कायवॉक हा बेहरामपाडा येथे अर्धवट बांधलेला असून त्याचे १५० फुटांचे काम अपुरे राहिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याठिकाणी हा स्कायवॉक अर्धवट राहण्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच, हा स्कायवॉक पादचाऱ्यांच्या सोयीसाठी त्वरीत पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) सदर स्कायवॉक हा हार्बर रेल्वे मार्गावरील पादचारी पुलास जोडला जाणारा असल्याने त्या ठिकाणी काम करण्यासाठी रेल्वे विभागाच्या परवानगी अभावी या स्कायवॉकचे काम पूर्ण करता आले नाही. सदर कामासाठी आवश्यक असलेल्या रेल्वे विभागाच्या व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परवानग्यांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगाव शहरातील अंगणवाडीमध्ये अत्यंत निकृष्ट दर्जाचा आहार दिला जात असल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(१९) ७५१६ (०७.०४.२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव शहरातील अंगणवाडीमध्ये अत्यंत निकृष्ट दर्जाचा आहार दिला जात असल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वास्तविक दररोज वेगवेगळा आहार देणे बंधनकारक असतांना संबंधित ठेकेदारामार्फत शासनाचे नियम पायदळी तुडविला जात असूनही याबाबत आवश्यक ती कारवाई केली जात नसल्याने चिमुकल्या विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे हे पाहता शासन त्वरित आवश्यक ती कारवाई करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११.०६.२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत एकूण २३ महिला मंडळ/महिला बचत गट व महिला संस्था यांना आहार पुरवठयाचे काम देण्यात आलेले असून त्यांचेमार्फत ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना ठरवून दिलेल्या पाककृतीनुसार सकाळचा नाश्ता व गरम ताजा आहाराचा पुरवठा करण्यात येतो. सदर पुरवठादार त्याप्रमाणे आहार पुरवठा करत नसल्यासंबंधी बाल विकास प्रकल्प कार्यालयास कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) येथे हुतात्मा स्मारकावर स्वातंत्र्य सैनिकांचे नांव कोरण्याबाबत**

**(२०) ७५१८ (०७-०४-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे हुतात्मा स्मारकावर स्वातंत्र्य सैनिकांचे नांव कोरावे ही

स्थानिक नागरिकांची मागणी असल्याचे माहे जानेवारी, २०१५मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१५) :** (१) अप्पर जिल्हाधिकारी, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना दिनांक २७.१.२०१५ रोजी श्री.शेख आसिफ शेख रशीद मा.आमदार यांचे पत्र प्राप्त झाले आहे.
(२) मालेगाव शहरात हुतात्मा स्मारकारवर नावे कोरण्याच्या निर्णयामुळे कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ नये, हिंदु व मुस्लीम समाजात तेढ निर्माण होऊ नये याकरिता हुतात्मा स्मारकांवर नाव कोरण्यासंदर्भात 'परिस्थिती जैसे थे' ठेवण्याचा निर्णय शासनाने सन २०११ मध्ये घेतलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अपंग उमेदवारांना T.E.T परीक्षेसाठी अर्धा तास जादा वेळ देण्याबाबत**

**(२१) ७५३० (०९-०४-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्पर्धापरिक्षामध्ये अपंग उमेदवारांना अर्धा तास जास्त वेळ दिला जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धर्तीवर T.E.T परिक्षेकरिता सुध्दा अपंग उमेदवारांना अर्धा तासाची जास्त वेळ देण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०७-२०१५) :** (१) होय.
(२) सन २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या टीईटी परिक्षेसाठी अपंग विद्यार्थ्यांना प्रतितास २० मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) महानगरपालिकेने आरक्षित केलेल्या जागेचा वापर सध्या इतर कामांसाठी करण्यात येत असल्याबाबत**

**(२२) ७५४४ (०८-०४-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) महानगरपालिकेने आरक्षित केलेल्या जागेचा वापर ज्या योजनेसाठी

जागा आरक्षित केली तो हेतू डावलून इतर कामे केली जात असल्याने नागरिकांना सोयी सुविधा मिळण्यापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षित जागांवर महानगरपालिकेने आरक्षणाच्या हेतूव्यतिरिक्त कुठल्याही स्वरुपाची बांधकाम परवानगी दिलेली नाही. तथापि काही आरक्षित खाजगी जागांच्या मालकांनी अनिधकृतपणे आरक्षित जागांवर बेकायदेशीरपणे किरकोळ स्वरुपाची बांधकामे केल्याचे निदर्शनास आले असून त्या त्या प्रकरणात महानगरपालिकेमार्फत नियमानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मनमाड, मालेगांव, इंदोर हा नविन मार्ग टाकणेबाबत

**(२३) ७५५२ (०७-०४-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड, मालेगांव, इंदोर हा नविन रेल्वे मार्ग टाकणेकरिता २५ % रक्कम मध्यप्रदेश शासन, २५ % महाराष्ट्र शासन व ५० % रक्कम केंद्र शासन भरणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने २५ % रक्कम भरली आहे काय अथवा भरणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०७-२०१५) :** (१) होय, प्रकल्पास आर्थिक सहभागाविषयीचा निणय राज्य शासनाने दिनांक ०६.०३.२०१० रोजी घेतला आहे.

(२) प्रकल्पास अद्याप केंद्र शासनाची (रेल्वे मंत्रालय) मंजूरी अप्राप्त आहे. मंजूरी प्राप्त झाल्यानंतर निधी वितरणाविषयी विचार करणे योग्य होईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### देवरुख (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयातील अधिक्षकाची पद रिक्त असल्याबाबत

**(२४) ७५९८ (०७-०४-२०१५). श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरुख (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयातील अधिक्षक यांची रत्नागिरी येथे जिल्हा शासकीय रुग्णालयात बदली झाल्यानंतर गेल्या तीन महिन्यांपासून सदर रुग्णालयात हे पद रिक्तच आहे, हे खरे आहे काय,

(२) त्यामुळे सदर रुग्णालयाचा कारभार प्रभारीवर अवलंबून आहे त्याचप्रमाणे तीन पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१५ दुस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे गरीब व गरजु रुग्णांची हेळंसाड होत असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रुग्णालयातील एकुण् रिक्त असलेले चार पदे कधीपर्यत भरण्यात येणार आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०७-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) सदर रुग्णालयातील नियुक्त ३ वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी २ वैद्यकीय अधिकारी अनधिकृतपणे गैरहजर असल्याने सद्य:स्थितीत उपलब्ध वैद्यकीय अधिकारी तसेच कंत्राटी विशेषज्ञामार्फत रुग्णांना मोफत रुग्णसेवा पुरविली जात असल्याने रुग्णांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, असे म्हणता येणार नाही.
(४) सदर रुग्णालयातील रिक्त असलेली पदे भरण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**रत्नागिरी जिल्हयातील ८०० शाळांमधील संगणक बंद असल्याबाबत**

**(२५) ७५९९ (०७-०४-२०१५). श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयात सुमारे २ हजार ७४८ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळांना १ हजार १०३ संगणक संचाचा पुरवठा करण्यात आलेला आहे मात्र त्यापैकी केवळ ८०० शाळांमध्ये संगणक संच अद्यापपर्यंत सुरू आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित ३०३ शाळांमध्ये संगणक संच नादुरूस्त असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर संगणक दुरूस्तीविना पडून ठेवण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) व (५) एकूण ११०३ शाळांपैकी ९२७ शाळांत लोकवर्गणी, देणगी इ. मार्फत तर १७६ शाळांत सर्व शिक्षा अभियान योजनेतू संगणक संच देण्यात आले आहेत. लोकवर्गणी/देणगी इ. मार्फत प्राप्त झालेल्या संगणक संचांपैकी २६५ शाळातील तर सर्व शिक्षा अभियान योजनेतून प्राप्त संगणक संचांपैकी ३८ संच नादुरुस्त आहेत.

सदर शाळांमधील नादुरुस्त संगणकांपैकी बहुतांशी संगणक हे सन २००३ पासून पुरवठा केलेले असून त्याचे स्पेअर पार्टस जूने असल्याने उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे संगणकांची दुरुस्ती करणे शक्य होत नाही. सर्व शिक्षा अभियान योजनेतून मिळालेल्या नादुरुस्त संगणकांची दुरुस्ती करुन घेण्याबाबत संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

## मुंबईतील बोरिवली रेल्वे स्थानकात सोन-साखळी चोरींचे प्रमाण वाढल्याबाबत

**(२६) ७६०४ (०८-०४-२०१५). श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरिवली रेल्वे स्थानकात सोन-साखळी चोरीचे प्रमाण वाढले असून स्थानकात दिनांक ५ ऑगस्ट २०१४ ते दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत जवळ जवळ २१ चोरींची प्रकरणे समोर आली असून यामध्ये रु.८.३० लाख किंमतीच्या दागिन्यांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारांना प्रतिबंध घालण्याबाबत पोलीसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१५) :** (१) दिनांक ५ ऑगस्ट २०१४ ते दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत बोरीवली रेल्वे स्थानकात सोन-साखळी चोरीचे एकूण ११ गुन्हे दाखल असून त्यामध्ये रुपये ५,६५,०००/- किंमतीचा माल चोरीस गेला आहे. नमूद गुन्ह्यांपैकी २ गुन्हे उघडकीस आलेले आहेत व त्यामध्ये २ आरोपींना अटक करुन त्यांचेकडून रुपये ७८,०००/- माल हस्तगत करण्यात आलेला आहे. त्या २ गुन्ह्यांचे दोषारोपपत्र व इतर ९ गुन्हे अ वर्ग समरीकरीता अहवाल न्यायालयात पाठविण्यात आले आहेत.

(२) रेल्वे स्थानकावरील गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना लोहमार्ग पोलीसांकडून केली जाते.

(१) प्रवाशांना अपघात अगर गुन्ह्यात संदर्भात पोलीसांना माहिती द्यावयाची असल्यास ते मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाच्या फेसबुक ॲड्रेस www.facebook.com/Mubairailwaypolice तसेच WhatsApps नंबर ९८३३३१२२२२ यावर सुध्दा देवून शकतात.

(२) रात्रीच्या वेळी उपनगरीय रेल्वे गाड्यांमध्ये महिलांच्या सुरक्षेकामी तसेच महिलांच्या संदर्भात गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्याकामी महिलांच्या डब्यात मध्ये परिमंडळात २१८ पोलीस कर्मचारी व ११८ होमगार्ड तसेच पश्चिम परिमंडळात १५८ पोलीस कर्मचारी व ८२ होमगार्ड नेमले जातात.

(३) पोलीस उप आयुक्त, मध्य परिमंडळ व पश्चिम परिमंडळ, लोहमार्ग मुंबई कार्यक्षेत्रात महिला पोलीसांचे स्वतंत्र निर्भया पथक स्थापन्यात आले आहे.

(४) मुंबई व उपनगरातील रेल्वे स्थानकांवर गुन्हेगाराचे छायाचित्र/फुटेज मिळणेकामी १४५ सीसीटीव्ही व १९१८ कॅमेरे लावण्यात आलेले आहेत.

(५) चोरीच्या गुन्ह्यांचा समांतर तपास गुन्हे शाखा करते. ते सुध्दा गुन्हे उघडकीस आणतात तसेच गुन्हे रोखण्याकामी सुध्दा ते प्रयत्न करतात.

(६) मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाण्यांमध्ये व पोलीस उप आयुक्त कार्यालय मध्ये व पश्चिम परिमंडळ कार्यालयात महिला सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली आहे.

(७) सर्व रेल्वे पोलीस ठाण्यांमध्ये महिलांच्या तक्रारींची दखल तात्काळ घेण्याकामी महिला कक्ष स्थापना करण्यात आले आहेत.

(८) रेल्वे हद्दीमध्ये महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी मध्य रेल्वे सुरक्षा बल करवी १२७५ व पश्चिम रेल्वे करीता १३११ ही हेल्पलाईन रेल्वे प्रशासनामार्फत चालू केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अलिबाग (जि.रायगड) जिल्हा रुग्णालयात सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांना वेतन अदा केले नसल्याबाबत**

**(२७) ७६३७ (०७-०४-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) जिल्हा रुग्णालयात सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांना माहे जुलै, २०१४ पासून वेतन आदा केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या सहा महिन्यांपासून वेतन अदा न करण्याची कारणे कोणती,

(३) मागील जुलै, २०१४ पासून प्रलंबित असलेले वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१५) :**(१) व (२) हे अंशतः खरे आहे. जिल्हा रुग्णालय, अलिबाग, रायगड येथील १३ सुरक्षा रक्षकांचे माहे सप्टेंबर, २०१४ ते माहे फेब्रुवारी, २०१५ अखेरपर्यंतचे मानधन अनुदानाअभावी प्रलंबित आहे.

(३) जिल्हा रुग्णालय, अलिबाग, रायगड येथील १३ सुरक्षा रक्षकांचे मानधन अदा करण्याकरीता अनुदान उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**कोल्हारे (ता.कर्जत, जि.रायगड) येथील ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत**

**(२८) ७६४२ (०८-०४-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हारे (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायतीमध्ये प्रशासकीय नेमणूक असून प्रशासकामार्फत कामकाज चालू आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हारे ग्रामपंचायतीमध्ये कोणतीही बांधकामाची परवानगी न घेता व बांधकामासंबंधितचे मार्गदर्शक सूचनांचा विचार न करता बेकायदेशीर बांधकामे सुरु असल्याबाबत ग्रामस्थांनी तक्रारी केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा बेकायदेशीर बांधकामांबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :** (१) होय हे खरे आहे.
(२) नाही.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**करंजा (ता.उरण, जि.रायगड) येथील प्रस्तावित जेट्टीबाबत**

**(२९) ७६५१ (०४-०४-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करंजा (ता.उरण, जि.रायगड) येथे करंजा इंफ्रास्ट्रक्चर कंपनीने जेट्टी बांधण्याचे काम प्रस्तावित केले असून दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी कंपनीने कामास सुरुवात केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जेटटीच्या बांधकामामुळे परिसरातील सात पाड्यातील चार हजार मच्छिमारांचा पारंपारिक व्यवसाय संकटात सापडला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास या बांधकामास परिसरातील मच्छिमार व्यवसायिकांनी विरोध दर्शविला आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास मच्छिमार व्यवसायीकांचा विरोध लक्षात घेता शासन यावर कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१५) :** (१) होय.
(२), (३) व (४) करंजा खाडीमध्ये मौजे चाणजे येथे बहुउद्देशीय जेट्टी प्रकल्प निर्माण करण्यासंदर्भात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड आणि मे.करंजा टर्मिनल ॲण्ड लॉजिस्टिक्स प्रा.लि. यांच्यामध्ये स्वाक्षांकित करण्यात आलेल्या करारनाम्यातील तरतूदीनुसार; प्रकल्पाचे बांधकाम, कार्यचालन तसेच जेट्टीचा वापर यामुळे काही नुकसान होत असल्यास, त्याची भरपाई करण्याची संपूर्ण जबाबदारी विकासक कंपनीची आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील जव्हार बांधकाम विभागात**
**शासकीय निधीचा झालेला अपहार**

**(३०) ७७१७ (०९-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (ता.जव्हार, जि.पालघर) येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता,श्री.एम.वाय. शंकपाळे व श्री.डी.जी. होले सहायक अभियंता श्रेणी २ यांनी रु. १.३७

कोटीचा भ्रष्टाचार त्याचप्रमाणे ४.२० कोटी रुपयांचा अनियमित निविदा करुन शासकीय निधीचा नियोजनबध्द पध्दतीने अपहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मुख्य अभियंता सार्व.बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी दिनांक २ डिसेंबर, २०१४ रोजी सचिव (बांधकाम) सार्व.बांधकाम विभाग, मुंबई यांनी लेखी पत्राद्वारे सार्व.बांधकाम विभाग जव्हार यांना दिनांक २० मे, २०१४ रोजी रु. १.३७ व रु. ४.२० कोटी रुपयांचे अनियमित धनादेश देणा-या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करुन अधिकारी व कर्मचा-यांवर कोणतीही व कसल्याही प्रकारची कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी (पालघर) दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी अतिरिक्त मुख्य सचिव, सार्व.बांधकाम विभाग, मुंबई यांना संबंधित अधिकारी व कर्मचा-यांवर कारवाई करण्याबाबत लेखी पत्राद्वारे विनंती केली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित प्रकरणी जबाबदार अधिकारी व कर्मचा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये प्रशासकीय अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्याने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी दिनांक ०२.१२.२०१४ च्या पत्रान्वये शिफारस केल्याप्रमाणे संबंधित कार्यकारी अभियंता व सहायक अभियंता श्रेणी-२ यांच्या दि.१८.१२.२०१४ च्या शासन आदेशान्वये मुंबई प्रादेशिक कार्यालयाबाहेर अकार्यकारी पदावर तर, लिपिक विर्गीय कर्मचा-यांच्या विभागांतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) मा. लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेले मुद्दे लक्षात घेऊन प्रस्तुत प्रकरणी अंतिम अहवाल सादर करण्याच्या सूचना अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई, यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी बहूल पालघर, डहाणू विक्रमगड तालुक्यातील धामणी येथे सूर्या नदीवर बांधण्यात आलेले धरणाचे काम अद्यापी अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३१) ७७३९ (०७-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी बहूल पालघर, डहाणू विक्रमगड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी

सिंचनाखाली आणण्यासाठी १९७२ साली डहाणू तालुक्यातील धामणी येथे सूर्या नदीवर धरण बांधण्यात आले असून, राज्य शासन व जलसंपदा विभागाच्या गलथान कारभारामुळे तब्बल ३५ वर्षानंतरही प्रकल्पाचे काम अद्यापी अपूर्णावस्थेत असून प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला अद्यापी संबंधित शेतकऱ्यांना मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) सदरहू सूर्या प्रकल्प व या प्रकल्पाच्या कालव्यासाठी पालघर तालुक्यातील एकूण किती शेतकऱ्यांच्या किती क्षेत्राच्या जमिनी संपादीत करण्यात आल्या आहेत,

(३) सदरहू संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्यास ३५ वर्षापेक्षा अधिक कालावधी होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहे,

(४) सदरहू संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला संबंधितांना विनाविलंब मिळण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे तसेच, सदरची कार्यवाही किती कालावधीत पूर्ण होण्याच्या शासनाचा मानस निर्धारीत करण्यात आला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

सूर्या प्रकल्पातील धरणाचे काम पूर्ण असून १४६९६ हे प्रकल्पिय सिंचनक्षमते पैकी १२४९० हे.सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

सूर्या प्रकल्पासाठी आवश्यक एकूण १९४४.०० हे. क्षेत्रापैकी १६६८.०७ हेक्टर भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे. भूसंपादनापोटी रु. ३५७.१७ लक्ष जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडून अदा करण्यात आले असून उर्वरित रु. १३४.४७ लक्ष अदा करावयाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(२) सूर्या प्रकल्पासाठी एकूण सुमारे ९०७१ शेतकऱ्यांची जमिन आवश्यक असून, त्यापैकी पालघर तालुक्यातील सुमारे ५१०० शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पासाठी आवश्यक आहेत. शेतकऱ्यांचे १००.७२७ हे. क्षेत्र संपादीत केलेले आहे व उर्वरित १८४.३८७ हे. क्षेत्र संपादनाची कार्यवाही सुरु आहे.

(३) जमीनीचे अभिलेख अद्यावत नसणे, ७/१२ व संयुक्त मोजणी प्रत न जुळणे, तसेच निधी अभावी कलम ४ घोषित न करणे, यास्तव भूसंपादन प्रकरणी विलंब झालेला आहे.

(४) कालव्यासाठी आवश्यक भूसंपादनासाठी कामाच्या आवश्यकतेनुसार विहीत पध्दतीने कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हा रुग्णालयातील ब्लड सेपरेशन युनिट बंद अवस्थेत असल्याबाबत**

**(३२) ७७५९ (०७-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा रुग्णालयातील ब्लड सेपरेशन युनिट खरेदी करुन २ वर्षे होऊनही

अजुनही हे युनिट बंद अवस्थेत असल्याने शासनाचे करोडो रुपये वाया गेले असल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त युनिट बंद राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ च्या अनुषंगाने उतरादाखल दिलेल्या छापिल उत्तरातील विसंगती बाबत माहे जानेवारी, २०१५ अखेरपर्यंतची सद्यःस्थिती काय,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) या केंद्रातील सेंट्रीफ्युज मशीनमध्ये दिनांक १४.०९.२०१४ रोजी शॉर्टसर्कीट झाल्याने ते अचानक बंद पडले त्यानंतर मशिनची दुरुस्ती करण्यात आली असून दिनांक ०१.१२.२०१४ पासून मशीन पूर्ववत सुरु झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव व आसपासपासच्या तालुक्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत**

**(३३) ७७७६ (०८-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव व आसपासपासच्या तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या संदर्भात माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०१५ या दरम्यानच्या काळात झालेल्या जातीय हिंसाचार, तसेच नूर मस्जिद पाचोरा येथील कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत अल्पसंख्यांक जनप्रतिनिधी, तसेच अल्पसंख्यांक विकासासंदर्भात कार्य करणा-या सेवाभावी संस्था यांच्यावतीने तसेच मुफती हारुन जिल्हाध्यक्ष समाजवादी पक्ष कार्यालय आणि संबंधित स्थानिक अल्पसंख्यांक नागरीकांच्या संघटना यांच्या वतीने मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री अल्पसंख्यांक, मुख्य सचिव तसेच प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास विभाग), विशेष पोलीस उपमहानिरीक्षक (नाशिक परीक्षेत्र), पोलिस आयुक्त जळगांव , पोलिस अधिक्षक जळगांव यांच्याकडे माहे १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :** (१) श्री.रागीब अहमद, प्रदेश उपाध्यक्ष, मुस्लिम समन्वय समिती, म.रा.रा.३, गणेशपुरी, मेहरुण जळगाव यांनी दिनांक २९.०१.२०१५ रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक, नाकिश परिक्षेत्र, नाशिक यांच्योकडे अर्ज केला आहे.

(२) पाचोरा येथील झालेल्या घटनेच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन, पाचोरा येथे दिनांक १४.०१.२०१५ रोजी एक गुन्हा व दिनांक १५.०१.२०१५ रोजी तीन गुन्हे असे एकूण चार

दखलपात्र गुन्हे दाखल झाले आहेत. या गुन्ह्यांमध्ये दोन्ही समाजातील १०७ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकी ७३ आरोपींवर ११० ई ग प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. पाचोरा पोलीस ठाणे येथील पोलीस निरीक्षक यांनी ठोस प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात दुर्लक्ष केल्यामुळे त्यांची बदली करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यातील चिखली दाभाडी राजूर रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाल्याबाबत**

**(३४) ७७८६ (१०-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यातील चिखली-दाभाडी-राजूर रस्त्यांची अत्यंत दुरावस्था होऊन रस्त्याच्या मधोमध मोठमोठे खडे पडल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची त्वरित दुरुस्त करण्याबाबत संबंधितांकडे सातत्याने नागरिकांकडून मागणी करुनही अदयापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीकरिता निधी तरतूद करण्यात आली आहे काय, तसेच सदर रस्त्याच्या दुरुस्तीकरिता किती निधीची तरतूद केली आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याची दुरुस्ती लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) सदर रस्त्याच्या कि.मी. ६७/०० ते ७४/०० या लांबीसाठी रु.२००.०० लक्ष किंमतीचे काम अर्थसंकल्पात मंजूर असून सन २०१५-१६ साठी रु. २९.९८ लक्ष एवढ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.
(४) निधीच्या उपलब्धतेनुसार दुरुस्तीचे काम प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना जिल्हयातील अनेक प्रकल्पातील प्रलंबित भू-संपादनाबाबत**

**(३५) ७७८७ (०४-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील देवी दहेगांव प्रकल्पाचे शेतक-यांच्या जमिनी संपादन केल्या असून अद्याप काही शेतक-यांचे भू-संपादनाचा मावेजा शासनाकडे थकीत आहे, हे खरे आहे काय, व त्याची कारणे काय आहेत,

(२) असल्यास, जिल्हयातील अनेक प्रकल्पातील प्रलंबित भू-संपादनाबाबत शासनाने तडजोड केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यातील काही शेतकरी मयत झाले असून त्यांच्या वारसांना थकीत भू-संपादनाचा मावेजा कधी देण्यात येईल,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

मौ.देविदहेगाव प्रकल्पासाठी शेतक-यांचा भूसंपादनाचा मावेजा थकीत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्हयातील ११८ गावे, वाड्यांवरील योजना**
**अद्यापी अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(३६) ७७९३ (०७-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील जिल्हापरिषद अंर्तगत सन २००७-०८ ते २०१०-११ या तीन वर्षाच्या काळात १८० गावे, वाड्यांवर योजना राबविण्यासाठी कोट्यावधींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असतांनाही गेल्या आठ वर्षानंतरही यापैकी ११८ गावे, वाड्यांवरील योजना अद्यापी अपूर्ण अवस्थेत असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार उक्त काम तातडीने पुर्ण करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२१-०७-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

जालना जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत भारत निर्माण कार्यक्रमांतंर्गत सन २००७-२००८ ते २०१०-११ या काळात १८० योजना हाती घेण्यात आल्या होत्या. त्यापैकी ७५ नळ योजनांचे अंतिमीकरण करण्यात आले असून उर्वरित १०५ योजना अपुर्ण अवस्थेत आहेत.

(२) समिती अंतर्गत वादामुळे, समितीत बदल झाल्यामुळे तसेच लोकवर्गणी जमा न झाल्यामुळे योजना अपुर्ण राहिल्या आहेत.

(३) जिल्हा परिषदेमार्फत सदर समितीची पासबुके तपासून सदर समितीने किती रक्कम काढली याबाबत माहिती घेण्यात आली. १०५ योजनापैकी ५८ योजनांचे अध्यक्ष/सचिव यांनी मुल्यांकनापेक्षा जास्तीची रक्कम काढल्याचे निदर्शनास आले.

(४) अपुर्ण असलेली कामे जुन्या दराने तयार करण्याबाबत समितीने सहमती दर्शविली मात्र कामे पुर्ण करण्यासाठी ३ महिन्याचा कालावधी वाढवून दयावा अशी विनंती केली. त्यानुसार मु.का.अ.जि.प.जालना यांनी सहमती दर्शविल्यानुसार ५८ गावांतील समितीने हातावर ठेवलेल्या रक्कम एवढे काम केले. त्यामुळे समितीच्या हातावर आता शिल्लक रक्कम नाही. उर्वरित सर्व योजनांची अपुर्ण कामे पुर्ण करुन घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना नगरपरिषदेने तीनपट वाढीव पाणीपट्टीची घोषणा करून वाढीव पाणीपट्टीसाठी नागरिकांना नोटीसा बजावण्यात आल्याबाबत**

**(३७) ७७९७ (०६-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना नगरपरिषदेने तीनपट वाढीव पाणीपट्टीची घोषणा करून वाढीव पाणीपट्टीसाठी नागरिकांना नोटीसा बजावण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी पुरवठयाचे नियोजन महानगरपालिकेकडून झाले नाही, यामुळे तीनपट वाढीव बोजामुळे नागरिकात रोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढीव पाणीपट्टी रद्द करून नागरिकांना पुरेसे पाणी देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१५) :** (१) होय.

(२) जायकवाडी जालना पाणीपुरवठा योजने अंतर्गत जालना शहरास पाणी पुरवठा सुरु झालेला असून न.पा. हद्दीतील अस्तित्वात असलेल्या वितरण व्यवस्थेद्वारे मुबलक पाणी पुरवठा करण्यात येत आहे त्यामुळे नागरीकांत असंतोष नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील उपकेंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव**

**(३८) ७८०२ (०८-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना येथे "डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या" कार्यक्षेत्रातील विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २० ऑगस्ट, २०१४ मध्ये शासनाकडे मंजुरीसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपकेंदास विभागीय आयुक्तांनी जमीन उपलब्ध करून देण्याबाबतचे पत्र विद्यापीठास दिले असतानाही या प्रकरणी अद्यापपर्यंत अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विद्यापीठ कार्यक्षेत्रातील उपकेंद्र जालना येथे त्वरीत कार्यान्वीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०७-२०१५) :** (१) होय.

(२) होय, जालना येथे उपकेंद्र स्थापन करण्याचा निर्णय विदयापीठ प्रशासनाने घेतला होता, तथापि, विविध संघटनाकडून प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सामाजिक भावना लक्षात घेऊन विदयापीठाच्या कुलगुरुंनी, सदर निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**भोकरदन तालुक्यातील (जि.जालना) महत्वाच्या मार्ग असलेल्या भोकरदन ते पारध रस्त्यांची झालेली दुरावस्था**

**(३९) ७८२४ (०९-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन तालुक्यातील (जि.जालना) महत्वाच्या मार्ग असलेल्या भोकरदन ते पारध रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झालेली असून सदर रस्त्याचे एक वर्षापूर्वी दुरूस्तीच्या कामाचे उद्घाटन होऊनही कामास प्रत्यक्षात अद्यापही सुरूवात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्यामुळे नागरिकांना तसेच वाहनधारकांना एस.टी.बसेसना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व तदनुसार सदर रस्त्यांची तात्काळ दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
सदर रस्त्याची लांबी २३ कि.मी. आहे. यापैकी ५ कि.मी. लांबीतील काम पूर्ण व १३ कि.मी. लांबीत काम प्रगतीपथावर असून उवरीत ५ कि.मी. लांबीमध्ये पडलले खड्डे वेळोवेळी डांबर मिश्रित खडीने भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना तालुक्यातील सोमनाथ जळगावजवळील कल्याणी नदीवरील पुलाचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत

**(४०) ७८२५ (०९-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्हयातील सोमनाथ जळगावजवळील कल्याणी नदीवरील जवळपास ३ कोटी रूपये खर्चून उभारण्यात येत असलेल्या पुलाच्या कामाची मुदत संपूनही अद्यापही पुलाचे काम पूर्ण झाले नसल्याचे माहे डिसेंबर २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाचे काम सन २०१३ मध्ये सुरू होऊनही अद्यापी अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर पुलाचे काम संथगतीने सुरू असल्यामुळे वाहनधारकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उक्त पुलाचे काम लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे (२२-०६-२०१५) :** (१), (२), (३) व (४) सद्यस्थितीत दिनांक १२.०१.२०१५ रोजी पुलाचे पोच मार्ग सहीत काम विहित वाढीव मुदतीत पुर्ण करण्यात आलेले असून सदर पुलावरुन वाहतुक सुरळीत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अजंनी खु.(ता.लोणार, जि.बुलढाणा) येथील एका महिलेस समाजातून बहिष्कृत केल्याबाबत**

**(४१) ७८७५ (०६-०४-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजंनी खु. (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथील एका महिलेला समाजातून बहिष्कृत केल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची तक्रार स्थानिक पोलीस स्थानकांत नोंदविण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या तक्रारीनुसार पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :** (१) श्रीमती अयोध्या पांडुरंग कौटकर यांना बहिष्कृत केलेले नसून तीच्या घराशेजारील व्यक्तींसोबत झालेलया भांडणामुळे काही लोक वैयक्तिक कार्यक्रमात बोलवित नाहीत.

(२) व (३) श्रीमती अयोध्या पांडुरंग कौटकर यांनी न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी कोर्ट, लोणारे येथे अर्ज केल्याने प्रभारी पोलीस अधिकारी, यांनी एम.केस नं.१३/२०१४ कलम ४५२, २९४, १४३, १४८, १४९, ३२३, ५०४, ५०६ भा.दं.वि. प्रमाणे साळा व्यक्तींविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपासात एकूण चौदा व्यक्तींना अटक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौ.रायपूर ता.मेहकर, जि बुलढाणा येथे माहे डिसेंबर, २०१४ पासून रोहित्र बंद असल्याबाबत**

**(४२) ७८९७ (०४-०४-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.रायपूर (ता.मेहकर, जि बुलढाणा ) येथे माहे डिसेंबर, २०१४ पासून रोहित्र बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे रब्बी पिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) चौकशीअंती रोहित्र बंद करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) तसेच रोहित्र त्वरित चालू करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील मानखुर्द येथील इंदिरा परिसरात राहणा-या तरूणीवर बलात्कार करण्यात आल्याबाबत**

**(४३) ७९०२ (०६-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील मानखुर्द येथील इंदिरा परिसरात राहणा-या २३ वर्षीय तरूणीला नोकरीचे आमिष दाखवून तिला एका लॉजवर नेऊन थंड पेयातून गुंगीचे औषध देऊन अजित शहा या तरूणाने बलात्कार केल्याची घटना माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१५) :** (१) व (२) होय. या प्रकरणी फिर्यादीवरुन वाशी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ४९/२०१५, भारतीय दंड विधान कलम ३७६, ३२८, ४२०, ५०६ अन्वये दिनांक ३१.०१.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत गुन्हा पोलीस तपासावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील ताडदेव, अंधेरी, वडाळा, बोरिवली आदि आरटीओ कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणात एजंटचा सुळसुळाट झाल्याबाबत**

**(४४) ७९०७ (०४-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील ताडदेव, अंधेरी, वडाळा, बोरिवली आदि आरटीओ कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणात एजंटचा सुळसुळाट असून त्यांचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत असल्यामुळे परिवहन आयुक्त यांनी दलालांना हद्दपार करण्याचे आदेश नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशामुळे आरटीओ कार्यालयातील अधिकाऱ्यांनी असहकार काम सुरु केले असून नागरिकांची जाणीवपूर्व कामे रखडवत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०६-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) परिवहन कार्यालयातील नागरिकांची कामे दलालाशिवाय पार पाडण्यासाठी मार्गदर्शन कक्ष, एक खिडकी योजना, संकेतस्थळावर भेटीची वेळ देणे, संकेतस्थळाद्वारे आवेदन पत्रे व कार्यपध्दतीची माहिती उपलब्ध करणे व कार्यालयात माहिती फलक लावणे यासारख्या उपाययोजना केल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील प्रदुषणाच्या घटना रोखण्यासाठी कृती**
**आराखडा तयार करण्याचा घेतलेला निर्णय**

**(४५) ७९१४ (०६-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सदा सरवणकर (माहिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रदुषणाच्या घटना रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्रदुषण मंडळाने उल्हासनगरमधील प्रदुषणाच्या घटनेची गंभीर दखल घेऊन अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये व ती रोखण्यसाठी ठोस कृती आराखडा तयार करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कृती आराखडयाचे स्वरुप काय असणार आहे व त्यानुसार अंमलबजावणीस किती कालावधीत सुरुवात करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०१-०७-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे, दिनांक २९/११/२०१४ रोजी वालधुनी नदीमध्ये रसायन सोडण्याच्या घटनेची पुनरावृत्ती टाळण्याच्या शासनस्तरावर ठोस कृती करण्याचे ठरले.

(२) वरील घटनेच्या संदर्भात संबंधीत यंत्रणा जसे की म.प्र.नि.मंडळ.कल्याण - डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका व पोलीस यंत्रणा इत्यादींनी केलेल्या कारवाईचा आढावा दिनांक ०१/१२/२०१४ रोजी अपर मुख्य सचिव, पर्यावरण तसेच दिनांक ०१/०१/२०१५ रोजी मा.मंत्री, पर्यावरण यांच्या अध्यक्षेतेखाली घेण्यात आला. सदर बैठकीमध्ये संबंधीत यंत्रणांना अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी समन्वयाने काम करुन संबंधीत दोषीवर कडक कारवाई करण्याचे निर्देश होते. तद्‌नुसार म.प्र.नि.मंडळाकडून दोषी आढळलेल्या कारखाने वाहतूकदार यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली.

दिनांक ०१/१२/२०१४ रोजीच्या अप्पर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग यांच्या आदेशानुसार, संबंधित विभागाकडून या आदेशांच्या अंमलबजावणीचे काम सुरु असून सदर

बाबत सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी संबंधित विभागानी केलेल्या कार्यवाहीचा आढावा दिनांक ०१/०४/२०१५ रोजी घेऊन संबंधितांना योग्य ती कार्यवाही करण्यासाठी आदेश दिले.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कॉग्निझंट या इलेक्ट्रीक उपकरणांच्या उत्पादन क्षेत्रातील जनरल इलेक्ट्रीक उद्योग समुहाने ५०० कोटींची गुंतवणूक पुण्यातील प्रकल्पात करण्याबाबत घेतलेला निर्णय**

**(४६) ७९२४ (०९-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीतील कंपनी कॉग्निझंट या इलेट्रीक उपकरणांच्या उत्पादन क्षेत्रातील जनरल इलेकट्रीक उद्योग समुहाने ५०० कोटींची गुंतवणूक पुण्यातील प्रकल्पात करण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री यांच्या समवेत झालेल्या बैठकीत दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गुंतवणुकीमुळे पुण्यात किती नविन रोजगार निर्माण होणार आहे,
(३) असल्यास, याबाबतच्या पुढील कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०६-२०१५) :** (१)

(१) चाकण औद्योगिक क्षेत्रात जनरल इलेक्ट्रीक उद्योग समुहातील M/s. GE India Industrial Pvt. या कंपनीला २,७२,००० चौ.मी. क्षेत्र देणेत आले आहे. व घटकाकडून रु.१०२० कोटी गुंतवणूक अपेक्षित आहे.

(२) राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान टप्पा क्र-३ येथे मे. कॉग्निझंट या कंपनीस भूखंड क्र.१/१ क्षेत्रफळ ६८,८०० चौ.मी. चे देकारपत्र देण्यात आले आहे.

(२) व (३)

(१) M/s. GE India Industrial Pvt. या कंपनीमध्ये ४५३ व्यक्तींना रोजगार निर्माण झाला आहे.

(२) कॉग्निझंट या कंपनीमध्ये १०००० रोजगार प्रस्तावित आहे.

---

**राज्यातील अकरावीचे प्रवेश बेकायदेशीरपणे झाल्याबाबत**

**(४७) ७९३७ (०९-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अकरावीचे प्रवेश बेकायदेशीरपणे झाल्याबाबत शासनाने याप्रकरणी चौकशी करण्यासाठी नेमलेल्या सिस्कॅाम या संस्थेने याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुण्यातही इयत्ता अकरावीसाठी राबविण्यात आलेल्या सन २०१४-१५ च्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या माध्यमातून गैरव्यवहार करुन बेकायदेशीर प्रवेश दिल्याचे सिस्कॉम संस्थेच्या अहवालाव्दारे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अहवालात अकरावी प्रवेशातील गैरप्रकार व त्रुटी याबाबतचे स्वरुप काय आहे, त्यानुषंगाने यासाठी जबाबदार असणा-यांविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०७-२०१५) :** (१) शासनाने याप्रकरणी चौकशी समिती नेमलेली नाही. तथापि, सिस्कॉम या खाजगी संस्थेने अकरावी ऑनलाईन प्रवेशाबाबतच्या अहवाल शासनास सादर केला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सिस्कॉम या संस्थेने सादर केलेल्या अहवालामध्ये कोणत्याही प्रकारचे वस्तूनिष्ठ प्रकरण पुराव्यासह नमूद केले नाही. इ. ११ वी चे प्रवेश शासनाचे आरक्षणविषयक धोरण विचारात घेऊन विद्यार्थ्यांची मागणी व गुणवत्तेनुसार निश्चित केले जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगाव (ता. माणगांव जि.रायगड)येथील असहाय**
**विवाहितेवर बलात्कार करण्यात आल्याबाबत**

**(४८) ७९७१ (०६-०४-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (ता. माणगांव जि.रायगड)येथील पोलीस ठाण्यात मुद्दस्सर पटेल याच्यावर एका असहाय विवाहितेवर बलात्कार प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१५) :** (१) होय.
(२) सदर गुन्ह्यातील फिर्यादी यांनी गोरेगांव पोलीस ठाणे येथे दिनांक १७.०१.२०१५ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन गोरेगांव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ०३/२०१५ अन्वये भारतीय दंड विधान संहिता कलम ३७६(२), ३५४(ब), ५०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. न्यायालयाने आरोपीस दिनांक ०२.०२.२०१५ रोजी अटकपूर्ण जामिन मंजूर केला असल्याने अटक करण्यात आलेली नाही. सदरचा गुन्ह्याचा अधिक पोलीस तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील डोंगर भागात तसेच जंगलात अज्ञात**
**व्यक्तीकडून वणवे लावण्यात येत असल्याबाबत**

**(४९) ७९७३ (०७-०४-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील महाड शहराच्या आजुबाजूच्या त्याचबरोबर तालुक्यात अन्य ठिकाणी डोंगर भागात तसेच जंगलात अज्ञात व्यक्तींकडून कांडी टाकून वणवे लावण्यात येत असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वणवे लावल्यामुळे जंगल संपत्तीचे मोठ या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कठोर कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०६-२०१५) :** (१) रायगड जिल्हयातील महाड शहराच्या आजूबाजूच्या त्याचबरोबर तालुक्यात अन्य ठिकाणी डोंगर भागात तसेच जंगलात माहे डिसेंबर, २०१४ चे दरम्यान अज्ञात व्यक्तींकडून कांडी टाकून वणवे लावसण्यात आल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, महाड वनपरिक्षेत्रात शेतीसाठी राब जाळला जातो त्यामुळे ही आग आजूबाजूच्या क्षेत्रात पसरते. त्याचप्रमाणे महाड परिक्षेत्रात महामार्ग जात असल्याने वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. अशावेळी प्रवाशांकडून बिडी, सिगारेटची थोटके रस्त्याच्या कडेला टाकली जातात. त्यामुळे वणवा लागतो.

(२) महाड वनक्षेत्रात ऑक्टोबर ते डिसेंबर २०१४ या कालावधीत वणवा लागल्याच्या १५ घटना घडल्या असून एकूण ११५ हे क्षेत्र जळाले आहे. या आगीत मोठ्या झाडांना नुकसान झाले नसून जंगलातील पालापाचोळा व सुकलेली झाडे जळाली आहे.

(३), (४) व (५) प्रकरणी वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे.

---

**कर्जत (जि.रायगड) येथील नेरळ-माथेरान येथे एमएमआरडीएमार्फत**
**फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्प सुरू करण्याबाबत**

**(५०) ८१८० (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) येथील नेरळ-माथेरान हे मुंबई शहरास सर्वात जवळचे हिल स्टेशन असून उक्त परिसरातील आदिवासी गरिब नागरिकांचा आर्थिक विकास, पायाभुत सुविधांमध्ये

सुधारणा व प्रवाशांचा वेळ वाचविण्यासाठी एमएमआरडीएमार्फत फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्प सुरू करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑगस्ट २००९ मध्ये मान्यता मिळालेल्या फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्पासाठी एमएमआरडीएने तांत्रिक व वित्तीय निविदा बनविण्याकरिता १५ लाखांचा खर्चही केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्प सुरू करण्यासाठी शासन आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०८-२०१५) :** (१) व (२) होय.

(३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे फ्युनिक्ल्युलर रेल्वे प्रकल्प हाती घेण्यात आला होता. हे खरे आहे. परंतु तत्कालीन सार्वजनिक बांधकाम व पर्यटन मंत्री यांनी माथेरानसाठी रोप वे चा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून सदर प्रकल्पाला सर्वोच्च न्यायालयाकडून परवानगी मिळणे अपेक्षित आहे. यामुळे सद्य:स्थितीत एमएमआरडीएचा प्रस्तावित फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्प तुर्तास स्थगित करण्यात यावा,अशी शिफारस मुख्य सचिव यांना केली होती. यास्तव, सदर प्रकल्प मुंबई महागनर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्थगित केला आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.